मच्छिमार, मत्स्यसंवर्धक व मत्स्यकास्तकारांना बँकाकडून दिल्या जाणाऱ्या रु.२.० लाखाच्या अल्प मुदतीच्या खेळत्या भांडवली कर्जावर राज्य शासनामार्फत ४ टक्के व्याज परतावा सवलत देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : मत्स्यवि २०२३/प्र.क्र. ०६ (भाग-१) /पदुम १३**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई -४०० ०३२.
दि. ०४ नोव्हेंबर, २०२५

**वाचा:** १) शासन निर्णय क्रमांक : मत्स्यवि २०२३/प्र.क्र. ०६ /पदुम १३ दि.०९/०५/२०२५
२) आयुक्त मत्स्यव्यवसाय,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र जा.क्र.मत्स्य/नि/१११२०६/०४/२०२५ (भाग-५)/ दि.०४/०७/२०२५

**प्रस्तावना -**

वाचा क्रमांक १ येथे नमूद शासन निर्णयाद्वारे, मत्स्यव्यवसाय क्षेत्रास (प्रक्रिया उद्योग वगळता) कृषी समकक्ष दर्जा देण्यास मान्यता देण्यात आली आहे. या शासन निर्णयाद्वारे मत्स्यशेतकरी/संबंधित मत्स्यसंवर्धन प्रकल्प (प्रक्रिया उद्योग वगळता) यांना कृषी दराने वीज अनुज्ञेय करण्यास मान्यता देण्यात आली आहे. मत्स्यशेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्ड, बँकांकडून कृषी दराने कर्ज सुविधा, इत्यादी आणि कृषीनुसार अल्प दराने विमा संरक्षणाचा लाभ अनुज्ञेय करण्यास मान्यता देण्यात आली आहे. शेतकऱ्यांना सौर उर्जेबाबत उर्जा विभागाद्वारे देण्यात येणारे लाभ मत्स्यव्यवसायिकांना देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

केंद्र शासनाच्या धोरणाप्रमाणे बँकांकडून राज्यातील मच्छिमार, मत्स्यसंवर्धक व मत्स्यकास्तकारांना त्यांचा व्यवसाय सुरळीत चालविण्याकरीता अल्पमुदतीचे खेळते भांडवली कर्ज उपलब्ध होते. यामध्ये व्याजदर ७% प्रती वर्ष इतका निश्चित करण्यात आला आहे. सदरचे अल्पमुदतीचे खेळते भांडवली कर्ज संबंधित मच्छिमार, मत्स्यसंवर्धक व मत्स्यकास्तकारांनी कर्ज उचल केलेल्या तारखेपासून एक वर्षाच्या आत संपूर्ण कर्ज परतफेड केल्यास केंद्र शासनाकडून ३ टक्के दराने व्याज परतावा सवलत देण्यात येते व मच्छिमारांना ४% दराने परतफेड करावी लागते.

मत्स्यव्यवसायास कृषी समकक्ष दर्जा दिल्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील शेतकऱ्यांप्रमाणे ,मच्छिमार, मत्स्यसंवर्धक व मत्स्यकास्तकार इत्यादी किसान क्रेडिट कार्ड धारक मत्स्यव्यवसायिकांना एक वर्षाच्या आत संपूर्ण कर्ज परतफेड केल्यास बँकांकडून देण्यात येणाऱ्या रु. २.० लाखाच्या अल्पमुदतीच्या खेळत्या भांडवली कर्जावर ४ टक्के व्याज परतावा सवलत योजना राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

या शासन निर्णयाद्वारे मच्छिमार, मत्स्यकास्तकार, मत्स्यउत्पादक, मत्स्यव्यवस्थापन, मत्स्यबीज संवर्धक, मत्स्यबोटुकली संवर्धन करणारे घटक, Post Harvesting यामध्ये वर्गीकरण, प्रतवारी, आवेष्ठन, साठवणूक करणारे घटक अशा किसान क्रेडिट कार्ड धारक मत्स्यव्यावसायिकांना रू. २.० लाखापर्यंतचे अल्पमुदतीचे खेळते भांडवली कर्जावर राज्य शासनाकडून ४ टक्के व्याज परतावा सवलत देण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.

**उपरोक्त योजनेच्या अंमलबजावणीसाठी अटी व शर्ती खालील प्रमाणे राहतील-**

१. वाचा क्र.१ येथे नमूद शासन निर्णयान्वये व्याज परतावा सवलत अनुज्ञेय असणाऱ्या संबंधित लाभार्थ्यांचा अर्ज संबंधित बँकेने जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचेकडे सादर करावा.

२. लाभार्थी मच्छिमार KCC धारक असणे आवश्यक आहे.

३. अल्पमुदतीचे खेळते भांडवली कर्ज उचल केलेल्या तारखेपासून एक वर्षाच्या आत संपूर्ण कर्ज परतफेड करणे अनिवार्य राहील.

**व्याज परतावा सवलत वितरीत करण्याची कार्यपध्दती** -

१. शेतकऱ्यांना बँकाकडून पीक कर्ज उपलब्ध करून देण्याची कार्यवाही ज्याप्रमाणे सहकार विभाग /बँका यांचेमार्फत करण्यात येते , त्याप्रमाणे मच्छिमार, मत्स्यसंवर्धक व मत्स्यकास्तकारांना खेळते भांडवली कर्ज उपलब्ध करून देण्याची कार्यवाही राज्यातील सर्व राष्ट्रीयकृत बँका, खाजगी बँका, ग्रामीण बँका व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांचेमार्फत करण्यात यावी.

२. जिल्ह्याच्या मच्छिमारांना खेळते भांडवली कर्ज उपलब्ध करून देण्याबाबत येणाऱ्या अडचणी सोडविण्याकरिता सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय संबधित जिल्हा यांनी जिल्हा उपनिबंधक/ सहायक निबंधक सहकारी संस्था यांचेशी समन्वय साधावा .

३. मच्छिमार, मत्स्यकास्तकार मत्स्यउत्पादक इत्यादींना व्याज परतावा सवलत देण्याकरिता अर्थसहाय्य करण्यासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष उघडण्याची कार्यवाही सहकार विभागाने करावी.

४. सदर सवलतीकरिता होणारा खर्च भागविण्यासाठी सहकार विभागाकडून घेण्यात आलेल्या लेखाशिर्षाखाली, सन २०२५-२६ या वर्षाकरिता आवश्यक अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात येईल. त्यासाठी लागणारा अतिरिक्त नियतव्यय उपलब्ध करून घेण्याची कार्यवाही सहकार विभागाने करावी.

५. मच्छिमार, मत्स्यकास्तकार मत्स्यउत्पादक इ.ना या योजनेचा लाभ हा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू होईल .

हा शासन निर्णय दि. ०४/११/२०२५ रोजी पार पडलेल्या मा.मंत्रीमंडळाच्या बैठकीतील निर्णयास अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे. तसेच सहकार विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ०१/२०२५/ १८-स दि. २६/०९/२०२५ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२५११०४१३०५००४७०१ असा आहे. हा शासन निर्णय आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( कि.म.जकाते )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत: -**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव राजभवन मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव मंत्रालय मुंबई-३२
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव मंत्रालय मुंबई-३२
४. सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव मंत्रालय मुंबई-३२
५. मा.विधानसभा /विधान परिषद सदस्य ( सर्व)
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई-३२
७. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव , मंत्रालय मुंबई-३२.
८. अपर मुख्य सचिव (वित्त) महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई-३२.
९. प्रधान सचिव (सहकार ) मंत्रालय मुंबई ३२
१०. सचिव( पदुम) मंत्रालय मुंबई ३२
११. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था ,महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२. आयुक्त मत्स्यव्यवसाय महाराष्ट्र राज्य, मुंबई
१३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मत्स्योदयोग विकास महामंडळ, मुंबई
१४. जिल्हाधिकारी सर्व
१५. महाव्यवस्थापक,राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक, प्रादेशिक कार्यालय पुणे
१६. सर्व कार्यकारी संचालक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक.
१७. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक.
१८. प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मुंबई.
१९. सर्व विभागीय सह निबंधक , सहकारी संस्था
२०. सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था.
२१. सर्व प्रादेशिक उपायुक्त, मत्स्यव्यवसाय
२२. सर्व जिल्हा सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय
२३. निवडनस्ती -पदुम १३